ठाणे महानगरपालिका,ठाणे.
महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ४/१२/२००९

मा.स्थायी समिती सभा
सभा सुचना क्र.१८ दिनांक ३०/११/२००९
सभा क्रमांक१ दिनांक ४/१२/२००९

ठाणे महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची सभा शुक्रवार दिनांक ४/१२/२००९ रोजी कै.अरविंद कृष्णाजी पेंडसे सभागृहात सभा सुचना क्र.१८ दिनांक ३०/११/२००९ रोजीच्या विषयपत्रिकेतील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. चंद्रगुप्त सिताराम घाग | सभापती |
| २. | श्री. भैय्यासाहेब गंगाराम इंदिसे | सदस्य |
| ३. | श्री.पांडुरंग गोविंद पाटील | सदस्य |
| ४. | श्री.सुधाकर वामन चव्हाण | सदस्य |
| ५ | श्री.सुधीर विष्णु कोकाटे | सदस्य |
| ६. | श्री.सुभाष आत्माराम खारकर | सदस्य |
| ७. | श्री.दिलीप चंद्रकांत बारटक्के | सदस्य |
| ८. | श्रीमती सुरेखा सुरेख खातु | सदस्या |
| ९. | सौ.स्मिता मधुकर देशमुख | सदस्य |
| १०. | श्री.दिनेश दाजी कांबळे | सदस्य |

सदर सभेस खालीलप्रमाणे सदस्य अनुपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.राजन नारायण किणे | सदस्य |
| २. | श्री.हणमंत ज्ञानु जगदाळे | सदस्य |
| ३. | सौ.सुहासिनी सुनिल लोखंडे | सदस्या |
| ४. | सौ.कविता सुरेश पाटील | सदस्य |
| ५. | श्री.नजिब सुलेमान मुल्ला | सदस्य |
| ६. | श्री.यासिन अयुब कुरेशी | सदस्य |

**वंदेमातरम्ने सभेची सुरुवात होते.**

**मा.महापालिका सचिव अजेंडा वाचून दाखवितात.**

**<u>श्री.सुधाकर चव्हाण :-</u>**

मा.सभापती महोदय,प्रश्नांची उत्तरे आज सभा चालू झाल्यांनतर दिल्यावर आम्ही वाचणार कधी? त्यामुळे सन्मा.सदस्य श्री.पांडुरंग पाटील यांचेच प्रश्न वाचण्यांत यावेत आणि बाकी सर्व सन्मा.सदस्यांची प्रश्ने पुढच्या सभेला घेण्यांत यावीत. सन्मा.सदस्यांची जी प्रश्ने असतील त्यांची उत्तरे सर्व सदस्यांना सभेपूर्वी दोन-तीन दिवस आधी देण्यांत यावी.

**<u>श्री.पांडुरंग पाटील :-</u>**

मा.सभापती महोदय,मी मागील सभेत प्रश्न उपस्थित केला होता की,एखादी मालमत्ता लिलाव करायची आहे त्याकरिता निविदाकार आल्यानंतर कुठल्याही प्रकारची लिलावाची कार्यवाही केलेली नाही.त्याबाबत मला असे उत्तर देण्यांत आलेले आहे की,त्यातील आठ सदस्यांपैकी दोन सदस्यांनी परस्पर मालमत्ता कर भरलेला आहे, सहा सदस्यांनी मालमत्ता कर भरलेला नाही.त्यापैकी चार गाळे संस्थेकडे गहान आहेत ही वस्तुस्थिती मला आज कळलेली आहे.एकदा नव्हे तर तीनदा वृत्तपत्रामध्ये लिलाव पुकारला,गेली सहा महिने तीन नागरिकांनी लिलावासाठी बोली लावलेली आहे,आणि तुम्ही आज कबुल करता की,चुक झालेली आहे,अशा किती लिलावांबाबत आतापर्यंत आपण चुका केलेल्या आहेत? याचा खुलासा व्हावा.एका प्रकरणाची सत्य स्थिती आपल्या डोळयासमोर आलेली आहे,या खात्याचा,प्रभाग समितीचा कारभार किती निर्भयपणे चालत आहे हेच यावरुन सिध्द होत आहे. अशा चुकीच्या पध्दतीने किती मालमत्ता आपण जप्त केलेल्या आहेत याचा आढावा मला पाहिजे.हे प्रकरण दिसते तेवढे छोटे नाही. आजच्या पेपरमध्ये मुंब्र्यामध्ये ३०-३५ प्रॉपटर्यांचा लिलाव आलेला आहे.जास्तीत जास्त त्याच प्रॉपटर्या लिलावामध्ये काढल्या जातात जेथे मालक आणि भाडोत्र्यांमध्ये वाद असतात,त्यात लिटिगेशन असतात,म्हणून तेथे मालमत्ता कर भरला जात नाही,धोकादायक इमारतींच्या बाबतीतही तीच परिस्थीती आहे. सदरची इमारत मालकाला खाली करुन घ्यायची असते,एकदा भाडोत्री बाहेर गेले की,मालक मालमत्ता कर भरतो आणि पुन्हा त्या भाडोत्र्यांना तेथे स्थापित करीत नाही. मालकाला धार्जीन काही अधिकारी आहेत.याबाबत मा.उपआयुक्त साहेब आपण आयुक्तांच्या खुर्चीवर बसलेले आहात,मालमत्ता करासाठी आतापर्यंत ज्या ज्या प्रॉपटर्या जप्त केलेल्या आहेत,तसेच ज्या प्रॉपटर्या जप्त केल्या नाहीत त्या ठिकाणी मालक किंवा भाडोत्री राहत असेल, त्यांच्याकडून भाडे वसुल होणे आवश्यक आहे,भाडे वसुल होत नसेल तर कामात हलगर्जीपणा केला म्हणून त्या अधिका-यावर शास्ती लावण्यांत यावी.आणि त्या प्रॉपटर्या जप्त करताना शहानिशा करावी जेणेकरुन मालक आणि भाडोत्री यांच्यातील वादापोटी जर ती मालमत्ता जप्त केलेली असेल तर सत्य स्थिती बाहेर येणे आवश्यक आहे. तसेच जप्त केलेल्या प्रॉपर्टी बाबत मी मागे दोन वेळा प्रश्न विचारला होता,लेखी सुध्दा प्रश्न दिलेला होता की,या ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये प्रभाग समिती निहाय किती प्रॉपटर्या जप्त केलेल्या आहेत त्याचा लेखी खुलासा मला आज पर्यंत मिळालेला नाही.जेव्हा मी चर्चा केली तेव्हा सांगण्यांत आले की, कर्मचारी वर्ग अपुरा आहे,त्यामुळे आमच्याकडे रेकॉर्ड उपलब्ध नाही.याबाबत दुसरी वस्तुस्थिती अशी आहे की,एखादया मालकास जर ती प्रॉपर्टी डेव्हलप करायची असेल तर तो थकबाकीची रक्कम भरायला आपल्याकडे येतो,तेव्हा जे भाडे असेल ते वसुल केले जाते.कोणत्याच जप्त केलेल्या प्रॉपर्टीला नोटीस पाठविली जात नाही,जप्त केलेल्या प्रॉपटर्यांसदर्भात किती प्रॉपटर्या जप्त केल्या त्याचे पत्र आपल्याकडे असले पाहिजे,पत्र व स्मरण पत्र आपल्या विभागाकडे असायला पाहिजे,स्थावर मालमत्ता विभागाने खुलासा करावा.जप्त केलेल्या प्रॉपर्टीचे मालक महापालिका झाली,जेव्हा ती प्रॉपर्टी सोडविण्यासाठी एखादा माणुस पुढे येतो तेव्हा त्याच्याकडून आपण दामदुपटीने प्रशासकीय आकारासहित,जागेच्या मुल्यांकन सहित,जागेचा बाजार भावासहित टॅक्स वसुल केला जातो, असे असताना एखादा माणुस त्या जागेवर राहतो त्याच्याकडून आपण भाडे का वसुल करीत नाही?तशी

कायदयामध्ये तदतूद आहे, अशा प्रकारे किती कोटीचे उत्पन्न आपण बुडीत केलेले आहे? याचा संपूर्ण खुलासा मला लेखी स्वरुपात मिळावा.देण्यांत येईल की नाही? याचा मुला खुलासा पाहिजे.आतापर्यंत ब-याचशा प्रॉपटर्या जप्त झालेल्या आहेत त्याची नोंद सुध्दा आपल्याकडे नाही,फक्त कागदोपत्री पेपरला नोटीस दिली जाते. ती ताब्यात घ्यायची कोणी हा सुध्दा डिपार्टमेंटली वाद आहे.नोटीस काढली की, काम संपले पुढची कार्यवाही कोणी करायची हा सुध्दा डिपार्टमेंटली वाद आहे.हे वाद संपणे आवश्यक आहे, याची नोंद होणार आहे की, नाही? या ठाणे महानरगपालिका क्षेत्रामध्ये किती प्रॉपटर्या जप्त केल्या त्याची विगतवारी मला मिळणार की नाही? या प्रकरणाचे काय करणार? कोणाला नोटीस काढणार?कोणाला शास्ती करणार?खोटया माहितीच्या आधारे पेपरला तीन वेळा नोटीस दिली गेली,तीन नागरिकांनी ती प्रॉपर्टी घेण्यासाठी बोली लावलेली आहे,दोन-दोन हजाराच्या रिसीट काढून त्यांनी तेथे सहभाग दर्शविलेला आहे त्यांना कोणतेही उत्तर प्रशासनाने दिलेले नाही. याला जबाबदार कोण?

**श्री.पाटील -उपआयुक्त :-**

मा.सभापती महोदय,ज्या प्रॉपटर्या जप्त केलेल्या आहेत त्या कागदोपत्री जप्त न करता,संबंधितांनी सातबारा आणि प्रॉपर्टी कार्डावर महानगरपालिकेचे नांव दाखल करुन घेण्यासाठी पिंक कलरची स्लीप असते,मुंबई महानगरपालिकेमध्ये सदरची कार्यपध्दती आहे, आणि त्यावर महानगरपालिकेचा बोजा चढविला जातो,आणि ज्यावेळी जप्तीची कार्यवाही पूर्ण होते ती बाब ऑपरेशन ऑफ लॉ असते,त्यामुळे त्याला रजिस्ट्रेशन किंवा कुठल्याही कागदपत्राची आवश्यकता नसते,जप्तीची डायरेक्ट नोंद सातबा-याला किंवा प्रॉपर्टी कार्डला महानगरपालिकेचे नांव दाखल करावे लागेल. तशी कार्यपध्दती आपल्याकडे नसेल तर तशी आपल्याकडे सुरु करावी लागेल. दुसरी गोष्ट अशा मिळकती जप्त झाल्यानंतर महानगरपालिकेकडे त्या आपोआपच हस्तांतरीत व्हायला पाहिजेत. तसे झाले नसेल तर मी तशा सुचना प्रशासनामार्फत संबंधित विभागास देतो.

**श्री.पांडुरंग पाटील :-**

मा.सभापती महोदय,अशी जी खोटी प्रकरणे झालेली आहेत त्याबाबत आपण काय करणार आहांत?चुकीच्या माहिती अभावी वृत्तपत्रात गेलेल्या आहेत अशा किती प्रॉपटर्या आहेत? त्या कधी शोधून काढणार?किती दिवसांत आपण त्याबाबत उत्तर देणार आहात?

**श्री.पाटील-उपआयुक्त(मु) :-**

मा.सभापती महोदय,सदर प्रकरणा पूर्ण माहिती आल्यानंतर त्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यांत येईल.एक महिन्यांच्या आंत त्याबाबत सविस्तर माहिती मी आपणाला उपलब्ध करुन देतो.

**श्री.पांडुरंग पाटील :-**

मा.सभापती महोदय,परवाना विभागाकडून मला उत्तर देण्यांत आलेले आहे की, परवाना विभागाने महापालिका हद्दित ७० ते ८० हजाराचे उद्योगांचे सर्वेक्षण सुरु केले असून,कर्मचा-यांनी मात्र आजतागायत ७५०० उद्योंगांची नोंदणी केलेली आहे,गेल्यावर्षी ती ६.५ हजार होती.त्यांच्याकडून आपण तीन कोटी अपेक्षित उत्पन्न धरलेले आहे.परवाना विभागाने अपेक्षित उत्पन्न किती आहे ते सांगा?या संदर्भात मा.आयुक्तांशी चर्चा झालेली होती की,त्यांना स्वतंत्र कारभार उपलब्ध करुन दयावा खाजगी एजन्सी नेमून सर्वेक्षण करुन घेण्यांत यावे,अशा प्रकारचा बजेटच्या वेळेस मा.महासभेने ठराव मंजूर केला होता.तीन कोटीच्या आसपास आपले उत्पन्न बुडीत जाणार आहे,त्या डिपार्टमेंटला दोन-तीन वेळा विचारले होते की,अपेक्षित उत्पन्न तुम्ही करुन देणार की नाही,त्यावेळेस त्यांनी सांगितले होते की,आम्हाला खर्च वाढवून दया,आम्ही उत्पन्न वाढवून देऊ. आज ७० ते ८० हजार उद्योगधंदे असताना सुध्दा ७५०० उद्योगांचे आतापर्यंत सर्वेक्षण करण्यांत आलेले आहे.२.५ कोटींचे उत्पन्न बुडीत आहे,ज्या ज्या खातेप्रमुखांनी बजेटच्या वेळी चर्चा करीत असताना,प्रत्येक विभागाने हमी घेतली होती की,एवढे उत्पन्न आम्ही मिळवून देतो एवढा खर्च आम्हाला वाढवून दया,आपण त्यांच्या म्हणण्याप्रमाणे खर्च वाढवून दिला

परंतु त्यांनी उत्पन्न अपेक्षेप्रमाणे मिळवून दिलेले नाही.अजूनही वेळ गेलेली त्या त्या खातेप्रमुखाने याचा विचार करुन उत्पन्न कसे वाढविता येईल याबाबत कार्यवाही करावी,अन्यथा त्यांच्यावर कारवाई करण्याशिवाय आपल्याकडे गत्यंतर राहणार नाही.त्यांनी आतापर्यंत एजन्सीही नेमलेली नाही.अपेक्षित उत्पन्न मिळवून देण्यासाठी संबंधित विभागाकडून कुठल्याही प्रकारचा पाठपुरावा केला जात नाही.याबाबत सुध्दा उपआयुक्त (मु) आपल्याला निर्णय घ्यावा लागणार आहे. कर्मचारी वर्ग अपुरा आहे तर आपण खाजगी एजन्सी नेमा,जेणेकरुन सर्वेक्षण पूर्ण व्हायला पाहिजे.सर्वेक्षणामागे उत्पन्न हा जरी मुख्य हेतू नसला तरी, कोणत्या गाळयामध्ये कोणते केमिकल आहे, हे कळणे सोपे होईल. भविष्यात जर तेथे आग लागली तर आपल्याला उपाययोजना करणे शक्य होईल.प्रशासनाला सर्वेक्षण करावयाचे नाही का?

**डॉ.भातणकर- उपआयुक्त :-**

मा.सभापती महोदय,सन्मा. सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे त्याबाबतचा प्रस्ताव आजच्या सभेमध्ये मंजुरी करिता ठेवलेला आहे.आचारसंहितेपूर्वी हा विषय अजेंडयावर ठेवलेला होता, काही तांत्रिक अडचणींमुळे मा.आयुक्ताची स्वाक्षरी राहून गेली होती त्यामुळे आता पुन्हा आचारसंहितेनंतर ते प्रकरण सभेपुढे आणण्यात आले आहे.

**श्री.पांडुरंग पाटील :-**

मा.सभापती महोदय,सदरचा निर्णय मा.स्थायी समितीच्या फेब्रुवारी महिन्याच्या सभेमध्ये घेण्यांत आला होता. आणि मा.महासभेने मार्च महिन्यांच्या सभेत घेतलेला आहे.सचिव महोदया आपण हे सभागृहात सांगा की,हा प्रस्ताव तुमच्याकडे कधी आलेला आहे.सर्व खातेप्रमुखांना विनंती आहे की, ज्यावेळी मा.महासभा निर्णय घेते त्यावेळी त्याची अंमलबजावणी एप्रिल-मे महिन्यांमध्येच होणे आवश्यक आहे.

**सौ.मानकर-महापालिका सचिव :-**

मा.सभापती महोदय,कालच आमच्याकडे तो विषय आलेला आहे.

**डॉ.भातणकर-उपआयुक्त :-**

मा.सभापती महोदय,ज्या दिवशी आचारसंहिता लागली त्या आचारसंहितेच्या दिवशी जी आपली स्थायी समिती सभा झाली त्या दिवशी हा विषय अजेंडयावर घेण्यासाठी दिलेला होता,परंतु तांत्रिक अडचणींमुळे लेखापरिक्षा विभागाचा अहवाल राहिल्यामुळे प्रस्ताव पुन्हा मागे घ्यावा लागला.

**श्री.पांडुरंग पाटील :-**

मा.सभापती महोदय,ही प्रशासकीय बाब झाली,आमचे म्हणणे असे आहे की, ज्यावेळी महासभेमध्ये याबाबत धोरणात्मक निर्णय झाला,खातेप्रमुख म्हणून तो विषय एप्रिल-मे महिन्यांमध्येच आमच्यासमोर येणे आवश्यक होते,जेणेकरुन ८-१० महिने त्याबाबतीत कार्यवाही करण्यास तुम्हाला सोयीचे होणार आहे.तसेच महासभेच्या निर्देशाप्रमाणे काम करणेसुध्दा सुलभ होईल.तुम्ही कार्यवाही का करीत नाही? माझा आक्षेप त्या गोष्टीला आहे. सर्व सदस्यांची मागणी असते की,माझ्याकडे सर्व प्रकारच्या सुविधा मिळाव्यात,परंतु आमची खातेप्रमुखांकडून जी अपेक्षा आहे ती पूर्ण होत नाही.ज्यांनी ज्यांनी महासभेने केलेल्या निर्देशानुसार कामे केली नसेल त्यांना शास्ती लावणे आवश्यक आहे.

**श्री.पाटील-उपआयुक्त (मु) :-**

मा.सभापती महोदय,मा.महासभेने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यास दिरंगाई झालेली आहे,हे स्पष्ट झालेले आहे.त्याबाबत मी प्रशासनातर्फे दिलगीरी व्यक्त करतो,आणि त्या दिरंगाईस जे जबाबदार असतील त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करण्याचा प्रस्ताव ठेवतो.

**श्री.पांडुरंग पाटील :-**

मा.सभापती महोदय,ठाणे शहरात आपण नविन निर्णय घेतला की,ठाणे शहरातील ज्येष्ठ नागरिकांना विम्याचे संरक्षण मिळावे मा.महासभेने मंजूरी दिली,एजन्सीला मंजुरी आचारसंहितेपूर्वी झालेली आहे. आता पर्यत सदरची योजना जाहिर का केलेली नाही.याची कारणे काय आहेत? तुम्ही बजेट घेऊन बसा,ज्या ज्या कार्यक्रमांना ज्या ज्या योजनांना आतापर्यंत चालना दिली गेली नसेल त्यांची तुम्ही स्वतंत्र स्तरावर मिटींग लावा. बी.एस.यु.पी संदर्भात पुस्तिका आमच्यासमोर आली ज्या ज्या ठिकाणी कामे सुरु आहेत,त्यांची माहिती या पुस्तिकेत दिलेली आहे, कोणते काम कोणत्या स्तरावर आहे याचे विवेचन प्रशासनातर्फे करण्यांत यावे. नागरिक दोन-दोन वर्षे झाली आपली घरे सोडून दुसरीकडे राहावयास गेलेली आहेत,ती योजना किती वर्षासाठी होती,शासनाकडून आणि केंद्राकडून किती निधी आपल्याला मिळालेला आहे, आणि सदरच्या लोकांना पुन्हा त्या घरात कधी पुर्नःस्थापित करणार आहात याचा खुलासा व्हावा. तसेच प्रशासनास या योजनेबाबत ज्या अडचणी आहेत त्यासुध्दा त्यांनी येथे सांगाव्यात.जेणेकरुन त्या प्रकल्पास चालना देता येईल.

**श्री.अनिल पाटील -कार्यकारी अभियंता :-**

मा.सभापती महोदय,शासनाकडून २००१ कोटींचा बी.एस.यु.पी.प्रकल्प मंजूर झाला, त्यामध्ये ९ झोपडपट्टींचा समावेश होता त्यापैकी चार झोपडपट्टयांवर महासभेच्या निर्देशानुसार आपण कामकाज सुरु केलेले आहे.आनंदनगर चा बी.एस.यु.पी.प्रकल्प शासनाच्या नवीन गाईडलाईनप्रमाणे येत्या महासभेत मंजुरीकरिता पाठविण्यांत येणार आहे. ज्या झोपडपट्टया केंद्र शासनाने मंजूर केलेल्या आहेत परंतु,मा.महासभेने मंजूर केलेल्या नाहीत,महासभेने असे निर्देश दिलेले आहेत की,या चार झोपडपट्टयांच्या बी.एस.यु.पी प्रकल्पाचा अनुभव पाहून नंतर आम्ही पुढचा निर्णय घेऊ,पहिल्या डी.पी.आर १ आणि २मध्ये जी एकूण १० हजार घरे मंजूर झालेली आहेत,त्यापैकी ४ हजार घरांचे कामकाज हाती घेतलेले आहे,हा प्रस्ताव बनविताना ट्रान्झिट ही जी त्यामधील मुळ अडचण होती त्याबाबतीत महापालिकेमार्फत किंवा केंद्र शासनाच्या गृह निर्माण विभाग या पैकी त्या डी.पी.आर.मध्ये त्यापध्दतीचा उल्लेख नव्हता,महापालिकेमार्फत या झोपडपट्टया मंजूर झाल्यानंतर लोकांना भाडे देणे हा एक पर्याय नविन पध्दतीने तयार केला,जो एस.आर.डी.मध्ये वापरला जातो.साधारणतः महिन्याला १.५ हजार रुपये भाडे देऊन सदरहू लोकांना ११ महिन्यांच्या बोलीवर बाहेर काढलेले आहे.इमारत बांधकाम चालू केल्यानंतर ज्यावेळेस कार्यादेश दिला तो १८ महिन्यांचा होता इमारत ज्यावेळेस ठेकेदाराच्या ताब्यात दिली जाते त्यानंतर १८ महिने असा ठेक्याचा कालावधी त्यामध्ये निश्चित केलेला आहे.त्यामुळे भाडे जे आहे ते १८ महिने दिले जाईल. त्यानंतर ट्रान्झीट जसे ॲवलेबल झालेले आहे त्यापध्दतीने काम करीत असताना नागरिकांच्या मागण्या आल्या होत्या की,डी.पी.आर.३ मंजूर करताना,२५स्क्वेअर मीटर एक्झॅक्ट एरिया आम्हाला उपलब्ध करुन दया, तो एरिया आपण त्यांना महासभेच्या मंजुरीने उपलब्ध करुन दिला आहे, त्यामुळे त्यात १ ते १.५ महिन्याची दिरंगाई झाली, त्यानंतर प्रत्यक्ष काम सुरु झाल्यानंतर आम्हाला हाईट वाढवून दयावी अशा प्रकारची संबंधीतांची मागणी होती,तीही मा.आयुक्त साहेबांनी मान्य केली त्यामुळे स्ट्रक्चरल जे काही चेंजेस करावे लागले त्यामुळे थोडीशी दिरंगाई झालेली आहे. त्यामुळे पहिल्या टप्प्यातील ज्या इमारती आहेत ज्या लोकांना शिफ्ट करुन चालू केलेल्या आहेत,त्यामध्ये थोडासा एक-दोन महिन्यांचा कालावधी जास्त लागण्याची शक्यता आहे. मार्च महिन्याच्या आंत आठ इमारती कुठल्याही परिस्थिती पूर्ण करायच्या अशा पध्दतीचा कार्यक्रम आखलेला आहे. उर्वरित जो दुसरा टप्पा आहे तो साकेत आणि ब्रम्हांड या दोन ठिकाणी आपल्याला पी.बी.बी. मॉडेल्सप्रमाणे ज्या इमारती आहेत त्या ताब्यात आल्यानंतर आपण त्या लोकांना तेथे शिफ्ट करणार आहोत..बी.एस.यु.पी.स्कीमला लोकांचे सहकार्य मिळत आहे,त्यामुळे दुसरा टप्पा आहे तो तातडीने सुरु करता येईल. पहिल्या टप्प्यामध्ये केंद्र शासनाच्या माध्यमातून जो निधी उपलब्ध झालेला आहे तो डी.पी.आर १ व २ चा निधी महापालिकेकडे जमा झालेला आहे.केद्रशासनाचा जो हिस्सा आहे तो आलेला आहे,राज्य शासनाचा जो निधी आहे तो येणे बाकी आहे. कालच मंत्री महोदयांकडे सभा झाली मा.आयुक्त साहेब सुध्दा त्या सभेला उपस्थित होते. आठ

दिवसांमध्ये ते तो निधी आपल्याकडे पाठवित आहेत.त्यानंतर त्याचा जो पुढचा टप्पा आहे त्याची यु.सी. पाठविण्यांत येईल आणि त्यानंतर उर्वरित सर्व पैसे येतील,पैशांअभावी काम थांबलेले नाही,काम चालू आहे. ज्या तोडलेल्या इमारती आहेत त्यांना आपण मार्च महिन्यांमध्ये चार्ज देणार आहोत.

**श्री.पांडुरंग पाटील :-**

मा.सभापती महोदय,माझ्या प्रभागामध्ये ही योजना सुरु आहे,या योजनेमध्ये झोपडपट्टी धारकांना समावेश करणे,त्यांना समजावणे त्याचे मनोधैर्य तयार करणे यासाठी बरीच कसरत करावी लागली आहे, असे असताना सुध्दा महापालिकेकडे दोन ठिकाणी ट्रान्झिट कँम्प उपलब्ध आहेत,नागरिकांची समझूत काढल्यानंतर ते लोक जाण्यास तयार झाले आहेत,प्रशासनाकडून मात्र त्यांना ताबा देण्यांत येत नाही.एका बाजुला बी.एस.यु.पी प्रकल्प लवकरात लवकर पुर्ण होण्यासाठी आपण प्रयत्न करतो आणि दुस-या बाजुला ट्रान्झीट कॅम्प उपलब्ध आहेत,नागरिकांची माणसिकता तयार केली,चाव्या देण्यासंदर्भात असे ऐकायला मिळते की,आमच्याकडे ताबा दिला नाही,ताबा दिल्यानंतर उद्घाटन करावयाचे असल्याने थांबलो आहोत.बी.एस.यु.पी योजना ही ठराविक वेळेमध्ये पूर्ण होण्याकरिता त्यांना कालमर्यादा दिलेली आहे,असे असताना गेल्या एक ते दिड महिन्यांपासून नागरिक सदर ट्रान्झिट कँम्प मध्ये जायला तयार असताना त्यांना चाव्या का दिल्या जात नाही? त्यामागे काय कारणे आहेत?इमारत उभी केलेली आहे,परंतु जोपर्यंत बाजुच्या झोपडया पाडल्या जात नाही तोपर्यंत त्या इमारतीस रस्ता देणे शक्य नाही,ड्रेनेज सिस्टीम,पाण्याची पाईप लाईन देणे शक्य नाही. कोणतेही काम करताना त्याचे नियोजन करणे आवश्यक आहे,पण ते न केल्यामुळे ज्या कालमर्यादित ती योजना पूर्ण होणे आवश्यक आहे त्या वेळेत ती योजना पूर्ण होणार नाही. प्रशासनाच्या अंतर्गत खात्यांमध्ये जे वाद आहेत,किवा समन्वय नाही त्याचा त्रास नागरिकांना का व्हावा? ब्रम्हांड,साकेतचे धरुन आपल्याकडे २५० ट्रान्झीट उपलब्ध आहेत,तेथे ड्रेनेजचा,पावसाळी पाण्याचा त्रास नागरिकांना मोठया प्रमाणात होणार आहे,प्रशासन रात्री नागरिकांकरिता उपलब्ध नसते,रात्री आम्हाला नागरिकांच्या सेवेकरिता तेथे जावे लागते.पावसाळयापूर्वी ती वस्ती बाहेर कशी शिफ्ट करता येईल,नागरिकांचे मनोधैर्य कसे उंचवता येईल ही मानसिकता निर्माण करणे आवश्यक आहे.

**श्री.अनिल पाटील -कार्यकारी अभियंता :-**

मा.सभापती महोदय,साकेत येथे १९६आणि ब्रम्हांड येथे ९६ या ठिकाणी पी.पी.पी मॉडेलवर जी घर तयार झालेली आहे. ही घरे अॅलॉटमेंट करताना पात्रता यादी बघणे आवश्यक आहे, सिध्दार्थ नगर किंवा महात्माफुले नगर येथील बी.एस.यु.पी.चे नागरिक त्या घरांमध्ये न्यायचे आहेत,ट्रान्झीट म्हणून बी.एस.यु.पी कक्षाकडे मागणी नुसार चाव्या मिळाल्यानंतर त्या खोल्या त्यांच्या ताब्यात दिल्या जातील आणि सिध्दार्थनगर व महात्मा फुले नगर येथील पात्रता यादीचे काम चालू आहे.त्यांना ते ट्रान्झीट कँम्प म्हणून वापरावयाचे आहेत.

**श्री.पांडुरंग पाटील :-**

मा.सभापती महोदय,एस.आर.डी. आणि बी.एस.यु.पी याबाबत मी खुप अभ्यास केला आहे त्यामुळे मी त्याबाबतीत बरेच बोलू शकतो,बी.एस.यु.पी या प्रकल्पामध्ये सदरची खोली ही १९९५ ची आहे की,२००० ची आहे हा वाद नाही,त्या ठिकाणी जो कोणी राहत आहे त्याला घर देणे बंधनकारक आहे,त्यामुळे पात्रता यादी अपात्रता यादी हा विषय तेथे येत नाही.बायोमॅट्रीक सर्वेक्षण त्या विभागाचे करण्यांत आलेले आहे.तुम्ही महात्मा फुले नगर चा विषय काढत आहात,तेथे रस्ता रुंदीकरणामध्ये जी घरे तोडली,तेथे ३०-३५ वर्षे ते लोक राहत होते,त्यांनी महापालिकेस योगदान दिले आणि तेथे महात्माफुले नगर वसविले,त्यात कसली तुम्ही पात्रता यादी निश्चित करणार आहात.राहील त्याला घर अशी तुम्ही मा.महासभेत योजना आणली,तेव्हा पात्र-अपात्र हा विषय नव्हता,आणि बी.एस.यु.पी.मध्ये तो अपेक्षित सुध्दा नाही.तेथील नागरिक मागे लागले आहेत की,कधी घर खाली करायचे. ज्या अधिका-याकडे प्रकल्प असेल त्यांच्याकडून बॉन्ड पेपरवर लिहून घेण्यांत यावे की,या वेळेत ही योजना पूर्ण करु.अडचण

असेल तेथे आम्ही मान्यता देऊ. जेथे अडचण नाही,योजना सहज चालू शकते,सर्व तुमच्याकडे उपलब्ध आहे तरी तुम्ही त्यातून मार्ग का काढत नाही? ३०-३५वर्षे ते लोक तेथे राहत होते, त्यांनी स्वतःचे राहते घर तोडले ठीक आहे आपण त्यांना घर देत आहोत,त्यांची मानसिकता म्हणजे तेथे त्यांना होणारा त्रास तुमच्यापर्यंत पोहोचत नाही तेथल्या स्थानिक लोकप्रतिनिधींपर्यंतच तो पोहोचत आहे.कोणत्याही प्रकारची सुविधा तेथे महापालिका देऊ शकत नाही.स्थानिक नगरसेवकांना विचारा तेथील काय परिस्थिती आहे.पोखरण नगरचे ट्रान्झीट कॅम्प घ्या तेथे एस.टी.पी.च्या मागे ड्रेनेज लाईन आहे त्याच्याबाजुला मुळ रस्त्यात काम चालू झालेले आहे, १८ ते २० फुटाचा खड्डा ५ फुटावर खोदलेला आहे रात्री-अपरात्री काम सुरु आहे,एस.टी.पी.ची दुर्गंधी,डासांचा त्रास,विजेची सोय नाही,रात्री अपरात्री,दिवसा साप तेथे फिरताना आढळतात,अशा परिस्थितीत नागरिक तेथे राहतात,महिलांनी कसे राहायचे,रात्री-अपरात्री लाईट गेलेले असतात.तुमची कामाची पध्दत बदला.ज्या योजनेसाठी त्यांच्या झोपडया तोडल्या त्यांना कोप-यात नेऊन ठेवले त्यांना सोयी सुविधा लाईट,पाणी पुरविण्याची जबाबदारी तुमची नाही का?त्यातील काही लोक हरिओम नगर येथे नेऊन ठेवले आहेत.महापालिकेने ट्रान्झिट कॅम्प चेतन पारेख कडून घेतला,त्यांना लाईट चेतन पारेख कडून दिली जाते,भाडेकरुंकडून लाईट बिलाचे पैसे घेतले, ते घेऊन १५-२० दिवस झाले,परंतु बिल्डरने लाईट बिल न भरल्यामुळे शनिवारी रात्री ८.वा लाईट कापली, मुलुंडच्या डंपिंग ग्राऊंडपासून जवळ जवळ १०० मीटर वर ते ट्रान्झीट कॅम्प आहे,त्या माणसांनी तेथे कसे राहायचे,अशा प्रकारे नागरिकांची तुम्ही राहायची सोय केलेली आहे,त्यांचा विचार कोणी करायचा? तुमच्या विभागांचे अंतर्गत को-ऑर्डीनेशन नसल्यामुळे तो माणूस यायला ३- ४ महिने लेट झाला तर त्याचे उत्तरदायित्व तुमच्यावर येते आणि ते न्याय मागायला आमच्याकडे यतात या सर्व परिस्थितीचा गांभीर्याने विचार करा,गेलेल्या नागरिकांना परत कसे आणता येईल त्याचा विचार करा.या नागरिकांचा रोष तुम्हाला तुमच्या खुर्चीत स्वस्थ बसू देणार नाही. तेथील लोकप्रतिनिधींना या सर्व अडचणींना व समस्यांना सामोरे जावे लागते. रघुनाथ नगर येथे जे शौचालय उभे केले आहे त्याची ड्रेनेज लाईन आणि मैला रस्त्यावरुन वाहत असतो,गटारात लाईन सोडलेल्या आहेत आणि ते गटार उघडे आहे,दुपारी जेव्हा कडक उन असते तेव्हा पाणी सुकून त्याची दुर्गंधी पसरते,अशा प्रकारचे ट्रान्झीट कॅम्प नागरिकांना उपलब्ध करुन दिलेले आहेत,म्हणून आमचा आग्रह आहे की, ज्या लोकांना तुम्ही पाठविलेले आहे त्यांना परत त्या ठिकाणी आणा.याबाबत ठोस निर्णय घेणे गरजेचे आहे. त्या लोकांना तुम्ही कधी शिफ्ट करणार आहात ते सांगा.एक झोपडी तर अशी आहे की, ३ फुटावर २० फुट खोदले आहे,कधी ती झोपडी कोसळेल याचा भरवसा नाही.प्रशासनाने निर्णय घेणे आवश्यक आहे. तुम्ही महासभे समोर,स्थायी समिती समोर जों प्रकल्प आणला त्याला आम्ही कधी विरोध केला नाही,असे असताना तुम्ही या गोष्टींना चालना देणे आवश्यक नाही का?लोकप्रतिनिधींनीच फक्त ते पहावे का? अधिका-यांनी कागदी घोडे नाचवायचे का?ट्रान्झीट कॅंम्पना भेटी दया,नागरिकांच्या व्यथा ऐकून घ्या,तुम्ही किती वेळा त्या ट्रान्झीट कॅम्पना भेटी दिल्या ?ते सांगा.

**श्री.अनिल पाटील :-**

मा.सभापती महोदय,मा.नगरअभियंत्यासोबत २० दिवसांपूर्वी ट्रान्झीट कॅम्प मधील अडचणींचा आम्ही आढावा घेतलेला आहे. कालच त्यांच्यासोबत चर्चा झाली, हे ट्रान्झीट कॅम्प आपण बांधलेले नाहीत उदा.रघुनाथ नगर,हरिओम नगर येथील कॅम्प आपण बनविलेले नाही,एस.टी.पी.आपण बनविलेले आहे.तेथे ज्या अडचणी आहेत त्याकरिता एस्टिमेंट तयार करुन बजेटमध्ये तरतूद करुन,तेथील कामे करुन घ्यावे लागतील. त्यांनी तशी यादी दिलेली आहे. पाच-सहा दिवसांत सर्व एस्टिमेंट आम्ही सादर करु,विजेच्या प्रश्नाबाबत मा.आयुक्तांसोबत चर्चा झालेली आहे,विजेचा कॉमन वापर आहे,पॅसेज किंवा तेथील स्ट्रीट लाईट्स करिता तेथे पॅसेजस् मध्ये बल्ब लावलेले आहेत त्याचा जो खर्च आहे तो महापालिका करणार आहे.त्यासाठी त्यांनी मान्यता दिलेली आहे. तसेच घरातील विजेचा खर्च त्यांनीच भरावयाचा आहे,ब-याच लोकांनी त्याला सहमती दाखविली आहे. फुले नगर येथील विद्युत पुरवठा बंद केला होता त्याचे बील भरण्यांत आलेले आहे. तुम्ही म्हणता ती वस्तुस्थिती आहे,पण आपण त्यामध्ये दुरुस्ती करणार आहोत.

**श्री.पांडुरंग पाटील :-**

मा.सभापती महोदय,प्रशासनाची उपाययोजना कशी आहे ते पहा,पाणी खात्याचे गोडाऊन होते,तेथे वॉल,पाईप ठेवलेले होते, आतमध्ये २४ रुम्स बनविले वरचा स्लॅब लिकेज होता,नागरिकांनी परात,कळश्या लावून पावसात दिवस काढले,पावसाळयानंतर वर ताडपत्रीचे छत टाकण्यांत आले,तेही स्लॅबच्या ४ इंची आंत टाकण्यांत आले,त्यामुळे ताडपत्रीवरचे पाणी खाली न जाता स्लॅबवर आले आणि पुन्हा लिकेज चालू झाले.पूर्ण पावसाळा त्यांनी हाल अपेष्टात दिवस काढले,नागरिकांच्या जीवांशी आपण खेळणार आहेत का?

**श्री.अनिल पाटील :-**

मा.सभापती महोदय,दोन महिन्यांत आम्ही ट्रान्झीट कॅम्प उपलबध करुन देणार आहोत,आणि पाणी खात्याचे ते गोडाऊन एम.जी.पी.ने बनविलेले आहे, ते स्ट्रक्चरही तोडण्यांत येणार आहे, यापुढे तेथे ट्रान्झीटचे लोक शिफ्ट करणार नाही,ही दक्षता घेऊ. तसेच आता ज्या लोकांना शिफ्ट केले आहे क्रमाक्रमाने त्यांना त्या बिल्डींग्स्मध्ये किंवा दुस-या बिल्डींग्स्मध्ये शिफ्ट करु. साकेत बाबत मी यादी पाठवितो नियमानुसार ज्या काही अटी वगैरे आहेत त्यांची पूर्तता करुन आठ दिवसांमध्ये त्यांच्याकडून चाव्या ताब्यात घेऊ.

**श्री.दिलीप बारटक्के :-**

मा.सभापती महोदय,ठाणे शहरात मोठया प्रमाणात अनधिकृत बांधकामे चालू आहेत,शासनाच्या धोरणानुसार झोपडपट्टी मुक्त शहर बनवायचे आहे,त्याकरिता एस.आर.डी.,बी.एस.यु.पी या योजनांमार्फत आपण घरे उपलब्ध करुन देणार आहोत.मा.महासभेमध्ये एम.आय.डी.सी.च्या जागेवर बी.एस.यु.पी. योजना राबवायच्या अशा प्रकारचा ठराव केला होता, त्याचे पुढे काय झाले?त्याबाबत माहिती मिळावी

**श्री.अनिल पाटील :-**

मा.सभापती महोदय,बी.एस.यु.पी ही जी योजना आहे ती शहरामध्ये ज्या झापेडपट्ट्या आहेत प्रामुख्याने शासकीय जागेवर ज्या झोपडपट्ट्या आहेत त्यांचा विकास करणे. एम.आय.डी.सी. ही शासकीय जागा आहे,त्यांनी एन.ओ.सी. दिल्याशिवाय आपल्याला पुढे काही करता येत नाही. महासभेचा ठराव आपण घेतलेला आहे,तो महाराष्ट्र शासनाकडे पाठविलेला आहे,परवा मा.राज्य मंत्री यांच्याकडे सभा झाली ,तेच उद्योग मंत्री असल्यामुळे त्यांनी हा प्रश्न १० दिवसांत सोडवू असे कबुल केलेले आहे. ती पॉलिसी फ्रेम झाल्यानंतर केंद्र शासनाकडे पाठवून ते करता येईल.

**श्री.दिलीप बारटक्के :-**

मा.सभापती महोदय,फोटोपासचे काम पूर्ण झाले आहे का?

**श्री.अनिल पाटील -कार्यकारी अभियंता :-**

मा.सभापती महोदय,९ प्रभाग समित्यांमध्ये बायोमॅट्रीक सर्वेचे काम चालू आहे,बायोमॅट्रीकच्या माध्यमातून समाज विकास विभाग ते काम करीत आहेत,बी,एस.यु.पी.मध्ये तो त्यांचा सर्व डाटा एकत्र केला जाईल.फोटोपास हा एस.आर.डी.करीता त्याची आावश्यकता असते बी.एस.यु.पी करिता नाही.१९९५ पूर्वीचा पुरावा असावा अशी अट त्यामध्ये नाही,एम.आय.डी.सी.बाबत जो मा.महासभेने ठराव केला आहे त्या ठरावानंतर ज्या झोपडया असतील त्या बाद होतील.

**महापालिका सचिव प्रकरण क्रमांक १ २ ९ ९ वाचून दाखवितात**

**प्रकरण क्रमांक १ २ ९ ९ मंजूर**

**महापालिका सचिव प्रकरण क्रमांक १ ३ ० ० वाचून दाखवितात**

**प्रकरण क्रमांक १ ३ ० ० मंजूर**

**महापालिका सचिव प्रकरण क्रमांक १ ३ ० १ वाचून दाखवितात**

**प्रकरण क्रमांक १ ३ ० १ मंजूर**

**महापालिका सचिव प्रकरण क्रमांक १ ३ ० २ वाचून दाखवितात**

**प्रकरण क्रमांक १ ३ ० २ मंजूर**

**महापालिका सचिव प्रकरण क्रमांक १ ३ ० ३ वाचून दाखवितात**

**श्री.पांडुरंग पाटील :-**

मा.सभापती महोदय, खुलासा करण्यांत यावा.

**श्री.नाईक-मुख्य लेखा व वित्त अधिकारी :-**

मा.सभापती महोदय,ठाणे महानगरपालिकेसाठी विशेष हेतू साधन(Special Purpose Vehicle) स्थापन करण्यासाठी २० लाखांची निविदा या पूर्वी स्थायी समितीने मंजूर केली होती,आधी कंपनीने सर्विस टॅक्स इन्क्लुड केला नव्हता तो इन्क्लुड केल्यामुळे २ लाख ६ हजार चा वाढीव खर्च होतो त्या खर्चाला स्थायी समितीची मान्यता मागितलेली आहे.

**प्रकरण क्रमांक १ ३ ० ३ मंजूर**

**महापालिका सचिव प्रकरण क्रमांक १ ३ ० ४ ते १ ३ ० ७ वाचून दाखवितात**

**प्रकरण क्रमांक १ ३ ० ४ ते १ ३ ० ७ मंजूर**

**महापालिका सचिव :-**

मा.सभापती महोदय,विषय पत्रिका काढल्यानंतर काही विषय मा.स्थायी समितीच्या मान्यतेसाठी सचिव कार्यालयाकडे प्राप्त झालेले आहेत.

**श्री.सुधाकर चव्हाण :-**

मा.सभापती महोदय,आयत्यावेळी कोणतेही विषय मा.स्थायी समितीपुढे मंजुरी करिता आणण्यांत येऊ नयेत.

**मा.सभापती महोदय :-**

आयत्यावेळी कोणतेही विषय मा.स्थायी समितीच्या मान्यतेसाठी घेण्यांत येऊ नये. सर्व विषय मुळ विषयपत्रिकेवरच घेण्यांत यावेत.विषयपत्रिका काढल्यानंतर प्रकरणे आली तर ती पुढील सभेत घेण्यांत यावीत.

**श्री.पांडुरंग पाटील :-**

मा.सभापती महोदय,माझ्या कडे दोन प्रकरणे आलेली आहेत,एक श्री.लहु केशव कांबळे २००४ -०५मध्ये पाण्याचे कनेक्शन मंजूर केले,तीन महिन्याचे बील घेतले,त्याने १५ वेळा महानगरपाालिकेच्या विभागाशी संपर्क साधला की,मला बील दया त्याला अजून बील देण्यांत आलेले नाही. तसेच श्रीमती लंक्ष्मीबाई पाटील यांनाही पाण्याचे कनेक्शन दिलेले आहे व बील देण्यांत आलेले नाही.या तीन-चार वर्षामध्ये जे काही पाण्याचे कनेक्शन दिले गेले,कुठल्याही प्रकारची आकारणी विभागाकडून केली जात नाही,ही दोन प्रकरणे माझ्याकडे आहेत तीन-तीन महिन्यांचे बीले घेऊन सुध्दा त्यांना पाण्याच्या बीलाची आकारणी केली जात नाही,यावर प्रशासकीय आकार प्रशासनाकडून लावण्यांत येणार आहे का?त्याने

प्रभाग समिती कार्यालयात कधी कधी बिलासाठी फेरी मारली त्याच्या त्यांनी तारखाही लिहून ठेवल्या आहेत.नागरिक स्वतःहून पाण्याचे बील भरण्यास तयार आहेत,परंतु प्रशासनाकडून बीले लावली जात नाहीत.श्रीमती लक्ष्मीबाई पाटील यांच्या पाण्याच्या बीलावर मुख्यालयात आल्यानंतर २६/३/२००७ ला हे बील काढून दयावे असे लिहून अधिका-याने सही देखील केलेली आहे, तरी देखील बिल काढण्यांत आलेले नाही.

**मा.सभापती महोदय :-**

प्रशासनाने सदर प्रकरणाची चौकशी करावी व अहवाल सादर करावा.

**श्री.सुधाकर चव्हाण :-**

मा.सभापती महोदय,जी काही कारवाई करण्यांत येईल ती आम्हालाही कळविण्यांत यावी.

**श्री.दिलीप बारटक्के :-**

मा.सभापती महोदय,पदाधिकारी व अधिकारी यांचेकडे जे सुरक्षा रक्षक व वाहन चालक असतात त्यांना थंब इंम्प्रेशन मधून सुट देता येईल का? याची माहिती मिळावी.

**श्री.पांडुरंग पाटील :-**

मा.सभापती महोदय,पदाधिकारी आणि अधिकारी यांचेकडे जे वाहनचालक व सुरक्षारक्षक म्हणून काम करतात त्यांना थंब इंप्रेशन सक्तीचे करु नये कारण ते आमच्यासोबत सकाळी ७ वाजल्यापासून रात्रौ १-२ वाजेपर्यंत असतात. त्यामुळे त्यांना सकाळी १० वा. कार्यालयात येऊन थंब करणे शक्य नाही.

**श्री.पाटील उपआयुक्त(मु) :-**

मा.सभापती महोदय,आजच मा.आयुक्तांसोबत चर्चा झालेली आहे त्यांनी वाहनचालक व सुरक्षा रक्षक यांचे नोव्हेंबर २००९ महिन्यांचा पगार देण्याचे मान्य केलेले आहे. तसेच जे पदाधिका-यांचे वाहनचालक व सुरक्षा रक्षक आहेत त्यांना आम्ही थंब इंप्रेशनमधून सुट देत आहोत.

**श्री.दिनेश कांबळे :-**

मा.सभापती महोदय,आपल्या ठाणे महानगरपालिकेत बरेच बिगारी एकाच खात्यात शिपाई म्हणून १५-२० वर्षे काम करीत आहेत त्यांना आपण शिपाई पदाची पदोन्नती का देत नाही?

**मा.सभापती महोदय :-**

पदाधिकारी आणि अधिका-यांकडे सफाई कामगार,बिगारी हे शिपाई म्हणून काम करीत आहेत तसेच फायर ब्रिगेड मध्ये सुध्दा असे काही लोक आहेत की जे ड्रायव्हर म्हणून काम करतात.
त्यांना पदोन्नती देणेबाबत प्रशासनाने ठोस निर्णय घ्यावा.

**श्री.पाटील-उपआयुक्त(मु) :-**

मा.सभापती महोदय, चतुर्थ श्रेणी मधून तृतिय श्रेणीमध्ये पदोन्नती देणेबाबत एक ठराविक क्रमांक ठरलेला आहे,त्याचे शैक्षणिक पात्रता व सिनियारिटी पाहून दरवर्षी आपण अशा प्रकारच्या पदोन्नतीच्या ऑर्डर काढत असतो,आपण सिलेकटेड ऑर्डर काढत नाही सिनियारिटीप्रमाणे ज्यांचा क्रमांक येईल त्यांना पदोन्नती देण्यांत येईल.

---------------------------x-----------------------

प्रकरण क्रमांक :१२९९ विषय :- JNNURM प्रकल्पांसाठी उघडण्यांत आलेल्या बँक खात्यांतील शिल्लक रकमेची गुंतवणूक करणेबाबत.

**मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १३१० दिनांक ४.१२.२००९**

**ठ रा व :-**

JNNURM अंतर्गत विविध प्रकल्पांची खाती AXIS बँकेत उघडण्यांत आलेली असून खाली नमूद केलेल्या खातेनिहाय जमा असलेल्या एकूण रक्कम रु.८,००,००,०००/- इतक्या रकमेची राष्ट्रीयीकृत बँकेत गुंतवणूक करण्याकरीता खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करण्यांत येत आहे. खातेनिहाय रकमांचा तपशील.

| अनु.क्र. | प्रकल्पाचे नांव | खाते क्रमांक | रक्कम | मुदत |
|---|---|---|---|---|
| १ | EMD/SD | ०६१०१०२०००१६८५२ | ८,००,००,०००/- | १८० दिवस |

राष्ट्रीयीकृत बँकांचे व्याजदर खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | बँकेचे नांव | १८० दिवसांकरीता | १८१ दिवसांकरीता |
|---|---|---|---|
| १ | सेंट्रल बँक ऑफ इंडिया | ४.००% | ४.००% |
| २ | देना बँक, स्टेशन रोड शाखा, ठाणे | ४.००% | ४.००% |
| ३ | विजया बँक | ४.५०% | ४.५०% |
| ४ | युनियन बँक ऑफ इंडिया | - | ४.७५% |
| **५** | **बँक ऑफ महाराष्ट्र** | **५.२५%** | **६.००%** |
| ६ | कॉर्पोरेशन बँक | ३.००% | ४.००% |
| ७ | स्टेट बँक ऑफ इंडिया | ३.००% | ४.००% |

उपरोक्त बँकाचे व्याजदर देणेबाबत दूरध्वनीवरुन कळविण्यांत आले असून सदर व्याजदर फॅक्सद्वारे व प्रत्यक्ष आणून देण्यांत आले आहेत. मे.बँक ऑफ महाराष्ट्र, मनपा शाखा यांचे व्याजदर १८१ दिवसांकरीता ६% महत्तम असल्याने रु.८ कोटी मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ४५३ दि.२९.६.२००६ अन्वये खालीलप्रमाणे प्रथम गुंतवणूक करणेस मा.आयुक्त यांनी दि.२२.१.२००९ रोजी मान्यता दिली आहे.

सबब, सदर प्रकरणात प्रशासनाने शिफारस केल्याप्रमाणे प्रस्तावातील तांत्रिक बाबी व कायदेशीर बाजू प्रशासनाने तपासल्या आहेत व त्या योग्य व कायदेशीर आहेत असे गृहीत धरुन वरील रकमांची गुंतवणूक करण्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९२(१) नुसार ही समिती मान्यता देत आहे.

सुचक :- श्री.पांडुरंग पाटील

अनुमोदक :- श्री.सुभाष खारकर

**सर्वानुमते मंजूर**

**सही/- चंद्रगुप्त घाग**
सभापती,
स्थायी समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

प्रकरण क्रमांक :१३०० विषय :- अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभाग (मुख्यालय) मार्फत घेण्यांत येणा-या कारवाईकरीता जादा वेळ कामकाजाच्या भत्याबाबत.

**मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १३११ दिनांक ४.१२.२००९**

**ठराव :-**

ठाणे महानगरपालिकेच्या अनिधकृत बांधकामावर मा.उच्च न्यायालयाने दाखल झालेल्या जनहित याचिकेमधील आदेशानुसार अनधिकृत बांधकामावर प्रभावीपणे कारवाई करणेकरीता अतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभाग (मुख्यालय) कडून विशेष मोहिम माहे जाने.०८ पासून हाती घेण्यास आलेली आहे.

वरील सर्व मोहिमेमध्ये यांत्रिकी समस्या उद्धवणार नाही या दृष्टीने कार्यकारी अभियंता यांत्रिकी सदर पथकाचे कारवाईकरीता आवश्यक असलेले साहित्य व कुशल कामगार उपलब्ध करुन देणेबाबत कार्यालयीन आदेश देण्यात आलेले आहेत.

जाहिरात विभागाकडील अनधिकृत होर्डींग्ज काढण्याच्या कारवाईस यांत्रिकी विभागाकडील कर्मचारी उपस्थित असतात. दिवा, मुंब्रा, माजिवाडा इत्यादी भागात कारवाई करतेवेळी, कारवाई संपण्यास उशिर होतो. कारवाई संपून वाहने, गॅस सिलिंडर इत्यादी सामान परत कार्यशाळेमध्ये जमा करावे लागते. सदर कर्मचारी हे कार्यालयीन वेळेनंतरही कार्यरत असतात.

या प्रकरणी कार्यालयीन अहवाल पाहता, ठाणे महानगरपालिकेच्या धोरणात्मक निर्णयानुसार सर्व विभागातील अधिकारी सोडून एकूण १५ विभागाकडील कर्मचा-यांना जादा कामाचा भत्ता देण्यांत येत होता. या प्रकरणी मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ६२५ दि.११.७.२००७ अन्वये केलेल्या शिफारशीनुसार मा.महासभा ठराव क्रमांक १५४/२९ दि.३१.७.२००७ अन्वये आयुक्त कार्यालय, उपआयुक्त, कार्मिक विभाग, आस्थापना, विधी विभाग, लिपिक, शिपाई, ए.सी. ऑपरेटर, वायरमन, जमादार इत्यादी नव्याने समावेश करणेत आला आहे. सदर प्रकरणी आदेश क्रमांक - ठामपा/पऑ/उपआ(मु)/आयुक्त-४१२९ दि.१.१.२००८ निर्गमित करण्यांत आला आहे.

सदर कर्मचारी हे कार्यालयीन वेळेनंतरही कार्यरत असतात. त्यामुळे या कर्मचा-यांनी जादा कामाचा भत्ता मिळणेबाबत विनंती अर्ज केला असून, सदर प्रस्तावास मा.आयुक्त सो., यांनी मान्यता दिली आहे.

सबब, सदर प्रकरणात प्रशासनाने शिफारस केल्याप्रमाणे प्रस्तावातील तांत्रिक बाबी व कायदेशीर बाजू प्रशासनाने तपासल्या आहेत व त्या योग्य व कायदेशीर आहेत असे गृहीत धरुनअतिक्रमण नियंत्रण व निष्कासन विभाग (मुख्यालय) यांचे कार्यालयाकडील खालील संवर्गातील कर्मचा-यांना दि.७.८.०९ च्या आदेशामध्ये निश्चित केलेल्या दरानुसार जादा कामाचा भत्ता अदा करणेस ही मा.स्थायी समिती मान्यता देत आहे.

| **अ.क्र.** | **पात्र कर्मचारी** | **संख्या** | **६० तास अथवा रु.२००० पर्यंत किंवा जी कमी असेल ती रक्कम** |
|---|---|---|---|
| १ | मुकादम | १ | २००० |
| २ | टिन मेकर | १ | २००० |
| ३ | वेल्डर | ४ | २००० |
| ४ | बिगारी मेकॅनिक | ३ | २००० |
| ५ | स.का.गॅसकटर | २ | २००० |

सुचक :- श्री.पांडुरंग पाटील अनुमोदक :- श्री.सुभाष खारकर

**सर्वानुमते मंजूर**

**सही/- चंद्रगुप्त घाग**
सभापती,
स्थायी समिती,ठा.म.पा

प्रकरण क्रमांक :१३०१ विषय :- छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय येथील मध्यवर्ती वातानुकूल यंत्रणेची वार्षिक निगा, देखभाल व दुरुस्ती करणेच्या कामी मुदतवाढ मिळणेबाबत.

**मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १३१२ दिनांक ४.१२.२००९**

**ठराव :-**

प्रकरणी कागदपत्र व त्यावरील कार्यालयीन अहवाल पाहता, छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय येथे ९०X३ टन क्षमतेची वातानुकूल यंत्रणा कार्यरत आहे. सदर यंत्रणा सुस्थितीत ठेवणेसाठी व झालेला बिघाड त्वरीत दुरुस्त करण्यासाठी सदर यंत्रणेसाठी वार्षिक निविदा निश्चित करण्यांत आलेली आहे. सदर कामी मे.परफेक्ट एअरकंडीशनिंग अँड सर्विसेस यांची अंदाजखर्चापेक्षा ३% ने कमी दराची निविदा व निविदा रक्कम रु.१५४९६१२/- मंजूर असून कार्यादेशाची मुदत दि.२५.९.२००९ पर्यंत होती.

छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय येथे सौर ऊर्जेवर आधारित मध्यवर्ती वातानुकूल यंत्रणा बसविणेचे काम विद्युत विभागातर्फे चालू आहे. सदर कामामध्ये सौर ऊर्जेवर आधारित मध्यवर्ती वातानुकूल यंत्रणेच्या निगा व देखभालीच्या कामाचा समावेश आहे. सदर प्रकल्प पूर्ण होण्यास चार महिन्याचा कालावधी लागणार आहे. पुढील वाढीव चार महिन्याच्या कालावधीकरीता अस्तित्वातील मध्यवर्ती वातानुकूल यंत्रणेची प्रिव्हेंटीव्ह मेंटेनन्स व ब्रेकडाऊन मेंटनन्सची कामे तातडीची असल्याने व गरजेची असल्याने रु.२०६४७०९.०० मात्रचा सुधारित अंदाजखर्च विद्युत विभागाने मंजूरीसाठी सादर केलेला आहे.

सबब, सदर प्रकरणात प्रशासनाने शिफारस केल्याप्रमाणे प्रस्तावातील तांत्रिक बाबी व कायदेशीर बाजू प्रशासनाने तपासल्या आहेत व त्या योग्य व कायदेशीर आहेत असे गृहीत धरुन छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय येथील मध्यवर्ती वातानुकूल यंत्रणेची वार्षिक निगा, देखभालपोटी दि.२५.९.२००९ ते २४.१.२००९ पर्यंतच्या मुदतवाढीस व सदर कालावधीकरीता वाढीव खर्च रु.५१५०९७/-(अक्षरी रुपये पाच लक्ष पंधरा हजार सत्त्याण्णव मात्र) म्हणजेच एकूण सुधारीत खर्च रु.२०६४७०९.०० (अक्षरी रुपये वीस लक्ष चौसष्ट हजार सातशे नऊ मात्र) या रकमेस ही समिती मान्यता देत आहे.

सुचक :- श्री.पांडुरंग पाटील                अनुमोदक :- श्री.सुभाष खारकर

**सर्वानुमते मंजूर**

**सही/- चंद्रगुप्त घाग**
सभापती,
स्थायी समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

--------------------X--------------------

प्रकरण क्रमांक :१३०२ विषय :- ठाणे महानगरपालिका क्षेत्राअंतर्गत रस्त्यावरील दिव्यांच्या निगा व देखभाल दुरुस्तीसाठी विद्युत साहित्य Rate Contract (दर करार) पध्दतीने खरेदी करणेबाबत.

**मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १३१३ दिनांक ४.१२.२००९**

**ठराव :-**

प्रकरणी कागदपत्र व त्यावरील कार्यालयीन अहवाल पाहता, ठाणे महानगरपालिकेअंतर्गत रस्त्यावरील दिव्यांच्या निगा व देखभाल दुरुस्तीसाठी विद्युत साहित्य Rate Contract (दर करार) पध्दतीने खरेदी करणेकामी मा.आयुक्त सो.यांनी दि.२७.२.२००९ अन्वये रु.२,४९,७३,२८८/- मात्रची प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली होती. प्रकरणी रु.२,४९,७३,२८८/-मात्रच्या (दर करार) पध्दतीच्या ई निविदा वर्तमानपत्रात जाहिरात देऊन नामाकीत उत्पादक कंपन्या व त्यांचे मालाच्या

गुणवत्तेबाबत व नियमित पुरवठयाबाबत हमीपत्र दिलेले अधिकृत विक्रेते यांचेकडून मागविण्यांत आल्या होत्या. सदर निविदेमध्ये खालील निविदाकारांनी भाग घेतलेला होता.

| अनु.क्र. | निविदाकाराचे नांव | हमीपत्र दिलेल्या नामांकीत उत्पादक कंपन्यांची नावे |
|---|---|---|
| १ | मे.चामुंडा एन्टरप्रायझेस | मे.बजाज इलेक्ट्रीकल्स |
| २ | मे.नेमस्त इलेक्ट्रीकल्स | मे.फिलीप्स इंडिया लि. |
| ३ | मे.राजेश अँड कं. | मे.जी.ई.इंडिया इंडस्ट्रीज प्रा.लि. |
| ४ | मे.समर्थ इलेक्ट्रीक | मे.सी एन्ड एस लाइटिंग एन्ड वायरिंग एक्सेसरीज प्रा.लि. |
| ५ | मे.त्रिशूल एजन्सीज | मे.क्रॉम्प्टन ग्रीव्ज |

निविदेतील प्रत्येक आयटेमकरीता टेस्टींग करुन तांत्रिकदृष्टया सक्षम ठरलेल्या निविदाकारासच ग्राह्य धरणेत आले. मे.समर्थ इलेक्ट्रीक यांचेकडे अशा प्रकारच्या कामाचा अनुभव नसल्याने त्यांची निविदा अवैध ठरविण्यांत आली. तांत्रिकदृष्टया सक्षम ठरलेल्यांपैकी लघुत्तम दरानुसार निविदेतील बाब क्र.१ ते १०, १२ ते २१, २३ ते २५, २९, ३१ ते ३३, ३५ ते ३६ करीता निविदेतील लघुत्तम दराने येणारा एकूण खर्च रु.१५९५३३८८/- हा सदर ३० बाबींच्या अंदाजखर्चाच्या रक्कम रु.२४२०९६००.१५ पेक्षा ३४.१०% ने कमी आहे.

बाबनिहाय प्रस्तावित दर व संख्या पाहता प्रत्येक निविदाकारांना द्यावयाच्या कार्यदेशांची रक्कम पुढीलप्रमाणे आहे.

| ठेकेदार | ठेकेदाराला निविदादरानुसार मंजूर केलेली रक्कम रु. |
|---|---|
| मे.चामुंडा एन्टरप्रायझेस | ३११९४०६२.०० |
| मे.नेमस्त इलेक्ट्रीकल्स | ५२५७९८९.०० |
| मे.त्रिशूल एजन्सीज | ७५०१३३७.०० |

तथापि ठेकेदारनिहाय साहित्य संख्या निश्चित करण्यांत आली असली तरी बाब क्र.१ ते १०, १२ ते २१, २३ ते २५, २९, ३१ ते ३३, ३५ ते ३६ करीता रु.१५९५३३८८/- मात्र पर्यंत एकत्रित खर्चाच्या आत राहून साहित्यांच्या संख्येमध्ये आवश्यकतेनुसार कमी अधिक बदल करणेत येईल.

सबब, वरील प्रकरणात प्रशासनाने शिफारस केल्याप्रमाणे सदर प्रस्तावातील तांत्रिक बाबी व कायदेशीर बाजू प्रशासनाने तपासल्या आहेत व त्या योग्य आहेत असे गृहीत धरुन ठाणे महानगरपालिकेअंतर्गत रस्त्यावरील दिव्यांच्या निगा व देखभाल दुरुस्तीसाठी विद्युत साहित्य Rate Contract (दर करार) पध्दतीने खरेदी करणेकामी पुढीलप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

१. बाब क्र.१ ते १०, १२ ते २१, २३ ते २५, २९, ३१ ते ३३, ३५ ते ३६ करीता एकूण रक्कम रु.१५९५३३८८/- मात्र (अक्षरी रुपये एक कोटी एकोणसाठ लक्ष त्रेपन्न हजार तीनशे अठ्ठयाऐंशी मात्र) पर्यंत सोबतच्या तक्त्याप्रमाणे साहित्य खरेदी करणेस,
२. बाब क्र.१ ते १०, १२ ते २१, २३ ते २५, २९, ३१ ते ३३, ३५ ते ३६ करीता रु.१५९५३३८८/- मात्र (अक्षरी रुपये एक कोटी एकोणसाठ लक्ष त्रेपन्न हजार तीनशे अठ्ठयाऐंशी मात्र) पर्यंत एकत्रित खर्चाच्या आत राहून साहित्यांच्या संख्येमध्ये आवश्यकतेनुसार कमी अधिक बदल करणेस,

३. खालील तक्त्याप्रमाणे ठेकेदारनिहाय रकमेला कार्यदिश देणेस

| ठेकेदार | ठेकेदाराला निविदादरानुसार मंजूर केलेली रक्कम रु. |
|---|---|
| मे.चामुंडा एन्टरप्रायझेस | ३११९४०६२.०० |
| मे.नेमस्त इलेक्ट्रीकल्स | ५२५७९८९.०० |
| मे.त्रिशूल एजन्सीज | ७५०१३३७.०० |

सुचक :- श्री.पांडुरंग पाटील अनुमोदक :- श्री.सुभाष खारकर

**सर्वानुमते मंजूर**

**सही/- चंद्रगुप्त घाग**
सभापती,
स्थायी समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

---------------------X-----------------

प्रकरण क्रमांक :१३०३ विषय :- ठाणे महानगरपालिकेसाठी विशेष हेतू साधन (Special purpose Vehicle) स्थापन करण्यासाठी महापालिकेचे आर्थिक विश्लेषण करुन बिझनेस प्लान तयार करण्यासाठी वाढीव रकमेस मान्यता मिळणेबाबत.

**मा.स्थायी समिती ठराव क्रमांक१३१४ दिनांक ४.१२.२००९**

**ठराव :-**

ठाणे महानगरपालिकेसाठी विशेष हेतू साधन (Special purpose Vehicle) स्थापन करण्यासाठी महापालिकेचे आर्थिक विश्लेषण करुन बिझनेस प्लान तयार करण्यासाठी मे.क्रिसील इन्फ्रास्ट्रक्चर ॲडव्हायझर्स यांची नेमणूक मा.स्थायी समिती ठराव क्रमांक २३९३ दि.१.१.२००९ नुसार करणेत आलेली आहे. सदरचे नेमणुकीस मान्यता देताना रु.२० लक्ष इतक्या रकमेच्या खर्चास मान्यता दिलेली आहे. मात्र सदर संस्थेबरोबर करारनामा करताना, करारनाम्यातील पान क्रमांक ३ अ.क्र.७ वर रु.२०,००,०००/-+ सर्व्हीस टॅक्स इतकी रक्कम महानगरपालिकेने द्यावयाचे मान्य केलेले आहे. एकूण खर्चास मान्यता घेताना रु.२० लक्ष + १०.३०% सर्व्हीस टॅक्स याप्रमाणे रु.२२,०६,०००/-इतक्या रकमेस मान्यता घेणे आवश्यक होते. तथापि, सर्व्हीस टॅक्स या रक्कम रु.२,०६,०००/- इतक्या रकमेस मा.स्थायी समितीची मान्यता घेण्यांत आलेली नव्हती.

तरी, सदर प्रकरणात प्रशासनाने शिफारस केल्याप्रमाणे प्रस्तावातील तांत्रिक बाबी व कायदेशीर बाजू प्रशासनाने तपासल्या आहेत व त्या योग्य व कायदेशीर आहेत असे गृहीत धरुन वाढीव रकमेच्या खर्चास ही समिती मान्यता देत आहे.

सुचक :- श्री.पांडुरंग पाटील अनुमोदक :- श्री.सुभाष खारकर

**सर्वानुमते मंजूर**

**सही/- चंद्रगुप्त घाग**
सभापती,
स्थायी समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

प्रकरण क्रमांक :१३०४ विषय :- प्रभाग क्रमांक १०५ मधील सोनालीनगर येथील आनंद निवास व लगतच्या परिसरात गटार व पायवाटेचे नुतनीकरण करणेबाबतचे प्रकरण माहितीसाठी सादर.

**मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १३१५ दिनांक ४.१२.२००९**

**ठराव :-**

प्रकरणी कागदपत्र व कार्यालयीन अहवाल पाहता, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) अन्वये खालील कामांना व त्यास येणा-या अंदाजखर्चाच्या रकमेस तसेच सदर काम खाली दर्शविलेल्या ठेकेदाराकडून नमूद केलेल्या लेखाशिर्षकाखाली करुन घेणेस मा.आयुक्त सो. यांनी त्यांचे अधिकारात मान्यता दिलेली आहे.

| कामाचे नांव | अंदाजखर्च रु. | लेखाशिर्षक | ठेकेदाराचे नांव |
|---|---|---|---|
| प्रभाग क्रमांक १०५ मधील सोनालीनगर येथील आनंद निवास व लगतच्या परिसरात गटार व पायवाटेचे नुतनीकरण करणेबाबत. | १,९९,६५०/- | नगरसेवक निधी | मे.अभिजीत शंकर जाधव, कल्याण. |

सबब, वरील प्रकरणात प्रशासनाने शिफारस केल्याप्रमाणे सदर प्रस्तावातील तांत्रिक बाबी व कायदेशीर बाजू प्रशासनाने तपासल्या आहेत व त्या योग्य व कायदेशीर आहेत असे गृहीत धरुन सदरच्या केल्या गेलेल्या कार्यवाहीची या स्थायी समितीने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये माहिती घेतली असून सदरचे प्रकरण पुढील कार्यवाहीसाठी पुन्हा प्रशासनाकडे पाठविण्यांत यावे असे ही समिती ठरवित आहे.

सुचक :- श्री.पांडुरंग पाटील
अनुमोदक :- श्री.सुभाष खारकर

**सर्वानुमते मंजूर**

**सही/- चंद्रगुप्त घाग**
सभापती,
स्थायी समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

----------------------X-------------------

प्रकरण क्रमांक :१३०५ विषय :- बाळकुम व गायमुख (घोडबंदर) जकात नाक्यावर बॅरगेटींग बनविणे व संरक्षक कठडे बांधणेबाबतचे प्रकरण माहितीसाठी सादर.

**मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १३१६ दिनांक ४.१२.२००९**

**ठराव :-**

प्रकरणी कागदपत्र व कार्यालयीन अहवाल पाहता, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) अन्वये खालील कामांना व त्यास येणा-या अंदाजखर्चाच्या रकमेस तसेच सदर काम खाली दर्शविलेल्या ठेकेदाराकडून नमूद केलेल्या लेखाशिर्षकाखाली करुन घेणेस मा.आयुक्त सो. यांनी त्यांचे अधिकारात मान्यता दिलेली आहे.

| कामाचे नांव | अंदाजखर्च रु. | लेखाशिर्षक | ठेकेदाराचे नांव |
|---|---|---|---|
| बाळकुम व गायमुख (घोडबंदर) जकात नाक्यावर बॅरगेटींग बनविणे व संरक्षक कठडे बांधणे. | २,५५,४००/- | जकात नाका बांधणे/सुधारणा | मे.शिवम म.का.स. |

सबब, वरील प्रकरणात प्रशासनाने शिफारस केल्याप्रमाणे सदर प्रस्तावातील तांत्रिक बाबी व कायदेशीर बाजू प्रशासनाने तपासल्या आहेत व त्या योग्य व कायदेशीर आहेत असे गृहीत धरुन सदरच्या केल्या गेलेल्या कार्यवाहीची या स्थायी समितीने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये माहिती घेतली असून सदरचे प्रकरण पुढील कार्यवाहीसाठी पुन्हा प्रशासनाकडे पाठविण्यांत यावे असे ही समिती ठरवित आहे.

सुचक :- श्री.पांडुरंग पाटील अनुमोदक :- श्री.सुभाष खारकर

**सर्वानुमते मंजूर**

**सही/- चंद्रगुप्त घाग**
सभापती,
स्थायी समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

----------------------------x--------------------

प्रकरण क्रमांक :१३०६ विषय :- प्रभाग क्रमांक ३ डोंगरीपाडा येथील सार्व.शौचालय समोरील गटारांची दुरुस्ती करणेबाबतचे प्रकरण माहितीसाठी सादर.

**मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १३१७ दिनांक ४.१२.२००९**

**ठ रा व :-**

प्रकरणी कागदपत्र व कार्यालयीन अहवाल पाहता, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) अन्वये खालील कामांना व त्यास येणा-या अंदाजखर्चाच्या रकमेस तसेच सदर काम खाली दर्शविलेल्या ठेकेदाराकडून नमूद केलेल्या लेखाशिर्षकाखाली करुन घेणेस मा.आयुक्त सो. यांनी त्यांचे अधिकारात मान्यता दिलेली आहे.

| कामाचे नांव | अंदाजखर्च रु. | लेखाशिर्षक | ठेकेदाराचे नांव |
|---|---|---|---|
| प्रभाग क्रमांक ३ डोंगरीपाडा येथील सार्व.शौचालय समोरील गटारांची दुरुस्ती करणे. | १,६८,४५०/- | गटार दुरुस्ती | मे.श्री वैभव रामचंद्र काशीद |

सबब, वरील प्रकरणात प्रशासनाने शिफारस केल्याप्रमाणे सदर प्रस्तावातील तांत्रिक बाबी व कायदेशीर बाजू प्रशासनाने तपासल्या आहेत व त्या योग्य व कायदेशीर आहेत असे गृहीत धरुन सदरच्या केल्या गेलेल्या कार्यवाहीची या स्थायी समितीने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये माहिती घेतली असून सदरचे प्रकरण पुढील कार्यवाहीसाठी पुन्हा प्रशासनाकडे पाठविण्यांत यावे असे ही समिती ठरवित आहे.

सुचक :- श्री.पांडुरंग पाटील अनुमोदक :- श्री.सुभाष खारकर

**सर्वानुमते मंजूर**

**सही/- चंद्रगुप्त घाग**
सभापती,
स्थायी समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

प्रकरण क्रमांक :१३०७ विषय :- प्रभाग क्रमांक १०० मधील सहयोग इमारतीच्या ए विंगचे ड्रेनेज लाईनची दुरुस्ती करणेबाबतचे प्रकरण माहितीसाठी सादर.

**मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १३१८ दिनांक ४.१२.२००९**

**ठ रा व :-**

प्रकरणी कागदपत्र व कार्यालयीन अहवाल पाहता, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(क) अन्वये खालील कामांना व त्यास येणा-या अंदाजखर्चाच्या रकमेस तसेच सदर काम खाली दर्शविलेल्या ठेकेदाराकडून नमूद केलेल्या लेखाशिर्षकाखाली करुन घेणेस मा.आयुक्त सो. यांनी त्यांचे अधिकारात मान्यता दिलेली आहे.

| कामाचे नांव | अंदाजखर्च रु. | लेखाशिर्षक | ठेकेदाराचे नांव |
|---|---|---|---|
| प्रभाग क्रमांक १०० मधील सहयोग इमारतीच्या ए विंगचे ड्रेनेज लाईनची दुरुस्ती करणे. | २,५२,०००/- | इमारत दुरुस्ती | मे.पी.एम.एन्टरप्रायझेस, नवी मुंबई. |

सबब, वरील प्रकरणात प्रशासनाने शिफारस केल्याप्रमाणे सदर प्रस्तावातील तांत्रिक बाबी व कायदेशीर बाजू प्रशासनाने तपासल्या आहेत व त्या योग्य व कायदेशीर आहेत असे गृहीत धरुन सदरच्या केल्या गेलेल्या कार्यवाहीची या स्थायी समितीने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३(ड) अन्वये माहिती घेतली असून सदरचे प्रकरण पुढील कार्यवाहीसाठी पुन्हा प्रशासनाकडे पाठविण्यांत यावे असे ही समिती ठरवित आहे.

सुचक :- श्री.पांडुरंग पाटील अनुमोदक :- श्री.सुभाष खारकर

**सर्वानुमते मंजूर**

**सही/- चंद्रगुप्त घाग**
सभापती,
स्थायी समिती
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

**(तद्नंतर मा.सभापती महोदय दुपारी ठिक १.०० वा.सभा संपल्याचे जाहीर करतात.)**

**सभापती,**
स्थायी समिती,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

**(सौ.छाया मानकर)**
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

सभा संपल्याची वेळ :- दु.१.०० वा.
दिनांक :- ४/१२/२००९
महापालिका सचिव कार्यालय,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.